TM

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरागांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प) ता.जि.ठाणे ४०१ १०१
दुरध्वनी क्र. २८१९ २८ २८/ २८१९ ३० २८ फॅक्स क्र. २८१९७६३६
ई मेल : 1. rchmbmc@rediffmail.com, 2) rchmbmc@gmail.com

## वैद्यकीय आरोग्य विभाग

जा.क्र मनपा/वैद्यकीय/१३५८/२०२१-२२ दि. १३/०७/२०२१

प्रति,
**जनसंपर्क अधिकारी,**
जनसंपर्क विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- न्युमोकोकल कोन्ज्युगेट व्हॅक्सिन (PCV) ची प्रेस नोट देणे बाबत.**

उपरोक्त विषयान्वये शासन आदेशानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात दि. १२ जुलै २०२१ रोजी **न्युमोकोकल कोन्ज्युगेट व्हॅक्सिन (PCV)** लसीचा नियमित लसीकरण कार्यक्रमांमध्ये सुरुवात करण्यात आली.

तरी सर्व वर्तमान पत्रात सोबतची प्रेसनोट देण्यात यावी.

**(डॉ.प्रकाश जाधव)**
**वैद्यकीय आरोग्य अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## वैद्यकीय विभाग
## न्युमोकोकल कॉन्ज्युगेट व्हॅक्सिन (PCV)
## प्रेसनोट

केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार राष्ट्रीय लसीकरण वेळापत्रकास विविध लसीचा टप्प्याटप्प्याने समावेश करण्यात येत आहे. मुलांना न्युमोकोकल आजारापासून सुरक्षित ठेवण्याकरिता सार्वत्रिक लसीकरण मोहिमेत न्युमोकोकल कॉन्ज्युगेट व्हॅक्सिन (PCV) लस दि. १२ जुलै पासुन समाविष्ट करणेबाबत निर्देश प्राप्त झाले होते.

त्याअनुषंगाने मुलांना न्युमोकोकल आजारापासून सुरक्षित ठेवण्याकरिता न्युमोकोकल कॉन्ज्युगेट व्हॅक्सिन (PCV) या लसीचा मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात दि.१२ जुलै २०२१ पासून नियमित लसीकरण कार्यक्रमांमध्ये सुरुवात करण्यात आली. मिरा भाईंदर शहरात आरोग्य केंद्राअंतर्गत कार्यक्षेत्रातील १४ नियोजीत लसीकरण सत्राच्या ठिकाणी एकूण ४४ अपेक्षित लाभार्थ्यापैकी २९ लाभार्थ्यांना न्युमोकोकल कॉन्ज्युगेट व्हॅक्सिन (PCV) लसीकरणाचा लाभ देण्यात आला.

तरी मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्यामार्फत शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, सद्यस्थितीत शासनाच्या आदेशान्वये दीड महिन्याच्या बालकास अपेक्षित लागू असलेल्या लसीसोबत न्युमोकोकल कॉन्ज्युगेट व्हॅक्सिन (PCV) लस शासकीय आरोग्य संस्थेत मोफत उपलब्ध आहेत. याकरिता महानगरपालिका कार्यक्षेत्रात दरमहा ३१५ नियमित लसीकरण सत्र आयोजित केली जातात. नियोजित लसीकरण सत्राची माहिती मनपा संकेत स्थळावर प्रदर्शित करण्यात आली आहे.

(डॉ.प्रकाश जाधव)
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका